# पर्यावरण विभाग
# पुणे महानगरपालिका
# प्रेसनोट

## "बांधकाम क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रण व उपाययोजना" या विषयावर कार्यशाळेचे आयोजन

**पुणे, दि.२५ फेब्रुवारी २०२६ :**

राज्यातील अनेक शहरांमध्ये पी.एम २.५ आणि पी. एम. १० या धुलीकणांमुळे वायू प्रदूषण वाढत असल्याने राज्य सरकारकडून मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या दि.२/११/२०२३ रोजी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, कलम ५ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दि.१५.१२.२०२५ रोजी पुणे महानगरपालिकेमार्फत बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी हवा गुणवत्ता तपासणी प्रणाली बसविणेबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे. शहरातील हवा प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी धूळ नियंत्रण उपाययोजना राबवून नागरिकांच्या आरोग्य संरक्षणाच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

सदर विषयाच्या अनुषंगाने आज दि. २५/०२/२०२६ रोजी "बांधकाम क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रण व उपाययोजना" या विषयावर पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता, पर्यावरण विभाग, आणि वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट इंडिया (WRI India) तसेच भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (IITM), पाषाण, पुणे यांच्या सहकार्याने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस पुणे महानगरपालिकेच्या मा.महापौर श्रीमती मंजुषा नागपुरे, मा. सभागृह नेते, श्री गणेश बिडकर, मा. महापालिका आयुक्त, श्री.नवल किशोर राम, मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (इ), श्री पृथ्वीराज बी.पी., मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (ज), श्रीमती पवनीत कौर, मा.शहर अभियंता श्री.अनिरुद्ध पावसकर, पुणे महानगरपालिका, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री.मनोज पाटील, मा. उपआयुक्त, पर्यावरण, श्रीमती किशोरी शिंदे, मा. पर्यावरण संवर्धन अधिकारी, श्री गणेश सोनुने व सह सचिव, क्रेडाई पुणे, तेजराज पाटील, NAREDCO पुणे, मराठी बांधकाम व्यावसायिक संघटना, महानगरपालिकेचे सर्व अभियंता आदी उपस्थित होते.

मा.महापौर महोदया यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात, हवा प्रदूषणाचा सामना करण्यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य आवश्यक असलेचे अधोरेखित केले व आपण सर्व नागरिक व प्रशासन यांनी मिळून हवा प्रदूषण कमी करणेसाठी कटिबद्ध असलेचे सांगितले. नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे गरजेचे आहे असे सांगून या कार्यशाळेच्या निमित्ताने पुणे महानगरपालिकेने बांधकाम क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी एक ठोस आणि दूरदर्शी पाऊल उचलले आहे. त्यानुसार बांधकामातून निर्माण होणारे धुलिकण रोखण्यासाठी बांधकाम व्यवसायिकांनी या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले. सदर प्रणाली बांधकाम क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेचा नाविन्यपूर्ण

उपक्रम असून हा उपक्रम राबविणारी पुणे महानगरपालिका ही पहिली महापालिका आहे असे मा. महापौर यांनी नमूद करून हवा गुणवत्ता तपासणी प्रणालीचे अनावरण केले.

मा. महापालिका आयुक्त यांनी पुणे शहरात सध्या वेगाने शहरीकरण होत असून त्यामुळे बांधकाम प्रकल्पांमध्ये वाढ झाली असून त्यान्वये वायुप्रदूषण वाढत आहे. एआरएआय (ARAI,२०२२) च्या अहवालानुसार, बांधकाम क्षेत्र हे धूळ उत्सर्जनात प्रमुख योगदान देणारे क्षेत्र आहे. त्यामध्ये पीएम १० धूलिकणांची पातळी जवळपास २३% आहे. यानुसार बांधकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रित करणे अत्यावश्यक बाब असून पुण्यातील वायू प्रदूषण वाहतूक, बांधकाम उपक्रम आणि रस्त्यावरील धूळ यासह अनेक स्रोतांमधून येते. पुणे शहरातील वाढते वायूप्रदुषणावर नियंत्रित ठेवून आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात येणार असेल्याचे सांगून सर्व क्षेत्रातून सहकार्य देण्याचे नागरिकांना आवाहन केले.

सदर प्रणालीद्वारे प्राप्त होणारी वास्तविक माहिती ही पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना प्राप्त होऊन त्यामुळे सूक्ष्म व अतिसूक्ष्म धुलिकण (PM 10 व PM 2.5) असलेल्या बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणांची तात्काळ सूचना प्राप्त होऊन त्या ठिकाणी तपासणीचे नियोजन करून प्रदूषणाच्या घटना नियंत्रित करणेकरिता उपाययोजना राबविण्यासाठी सूचना देण्यात येतील याकरिता पुणे महानगरपालिका व WRI India गेल्या दोन वर्षांपासून वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सहकार्याने काम करत आहेत.

मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (ज) यांनी सदर प्रणाली बाबत माहिती दिली. या प्रणालीतून सेन्सरद्वारे उपलब्ध होणारी माहिती पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या देखरेखीसाठी एकत्रित केली जाईल. शहराच्या हवेच्या गुणवत्तेचे संरक्षण करण्यासाठी आपल्याला सतत आणि समन्वित प्रयत्नांची आवश्यकता आहे असे नमूद केले.

श्री तेजराज पाटील, क्रेडाई यांनी पुणे महानगरपालिका राबवीत असलेल्या प्रदूषण नियंत्रण उपाययोजनेला पाठींबा व सहकार्य असेल याची ग्वाही दिली. तसेच श्री संजय देशपांडे, मराठी बांधकाम व्यवसायिक यांनी हवा प्रदूषण कमी करणेसाठी राबविलेल्या उपाययोजनांमध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे व मोठ्या तसेच लहान बांधकाम प्रकल्पांवरती देखील सदर हवा गुणवत्ता तपासणी प्रणाली बसविण्यात यावी असे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी मा. उपआयुक्त, पर्यावरण यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

(गणेश सोनुने)
पर्यावरण संवर्धन अधिकारी
पुणे महानगरपालिका

(किशोरी तोडमल- शिंदे)
उप आयुक्त, पर्यावरण
पुणे महानगरपालिका

सोबत:- १५/१२/२०२५ रोजीचे परिपत्रक

पृथ्वीराज बी.पी. (भा.प्र.से.)

**अतिरिक्त महापालिका आयुक्त**

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका**
पुणे म.न.पा. भवन, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दूरध्वनी क्र. : ०२०-२५५०१४५३
E-mail : addmce@punecorporation.org

जा. क्र. अति म.आ. (इ)/पर्या/४३७

दिनांक : 15.12.2025

**बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी हवा गुणवत्ता तपासणी प्रणाली बसविणेबाबतचे परिपत्रक**

राज्यातील अनेक शहरांमध्ये पी.एम २.५ आणि पी. एम. १० या धुलीकणांमुळे वायू प्रदूषण वाढत असल्याने राज्य सरकारकडून मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या दि.२/११/२०२३ रोजी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, कलम ५ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारणे आवश्यक आहे. एआरएआय (ARAI,२०२२) च्या अहवालानुसार, बांधकाम क्षेत्र हे धूळ उत्सर्जनात प्रमुख योगदान देणारे क्षेत्र आहे. त्यामध्ये पीएम१० धूलिकणांची पातळी जवळपास २३% आहे. यानुसार बांधकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रित करणेसाठी अत्यावश्यक बाब आहे.

वरील बाबींच्या अन्वये पुणे महानगरपालिकेने हवा गुणवत्ता सेन्सर उत्पादकांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरॉलॉजी (IITM), पाषाण, पुणे येथे सह-स्थान अभ्यास (Co-location Study) करण्यास सूचित केले होते. त्यान्वये उपकरणांसाठीची आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आली असून IITM च्या सह-स्थान अभ्यास द्वारे लघुसूचित करण्यात आलेले सेन्सर मेक आणि मॉडेल्सची यादी परिशिष्ट- ब मध्ये देण्यात आली आहे.

सदर परिपत्रकान्वये पुणे महानगरपालिकेद्वारे निर्देश देण्यात येतात की, पुणे महानगरपालिका हद्दीतील बांधकाम क्षेत्रफळ ५००० चौरस मीटर (Built-up Area) व त्याहून अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व खाजगी व सार्वजनिक निवासी आणि व्यावसायिक बांधकाम प्रकल्पांमध्ये तसेच सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये (Infrastructure Projects), बांधकामाच्या ठिकाणी पी.एम.(PM)२.५ आणि पीएम (PM) १० मोजण्यासाठी सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता देखरेख प्रणाली स्थापित करण्यात यावी. तसेच धूळ प्रदूषण तीव्रता दर्शविण्यासाठी एलईडी इंडिकेटर (LED Signal) प्रणाली बसविण्यात यावी, ज्यामुळे बांधकामाच्या ठिकाणावरील कर्मचाऱ्यांना तेथील हवेच्या गुणवत्तेची स्थिती समजून घेता येईल आणि त्यानुसार प्रदूषण कमी करणेसाठी त्वरित उपाययोजना करता येतील.

पुणे शहरातील बांधकामाच्या ठिकाणी बसविण्यात येणारे सदरचे सेन्सर हे परिशिष्ट – अ मध्ये दिलेल्या तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार असावेत. परिशिष्ट - ब मध्ये देण्यात आलेल्या सेन्सर उत्पादकांमधून सूचीबद्ध केलेल्या मेक आणि मॉडेलमधून निवडलेले असणे बंधनकारक आहे तसेच सेन्सर उत्पादकांची सुधारित यादी वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. बांधकामाच्या ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या सेन्सरमधून उपलब्ध होणारी हवा-गुणवत्ताबाबतची वास्तविक माहिती पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या देखरेखीसाठी केंद्रीयकृत हवा गुणवत्ता संकेतस्थळावर एकत्रित केली जाईल.

सर्व बांधकाम व्यावसायिकांना परिशिष्ट - क नुसार हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. याशिवाय, एलईडी इंडिकेटर (LED Signal) प्रणालीद्वारे दर्शविण्यात येणाऱ्या धूळ तीव्रता पातळीनुसार कृती मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात यावे.

सर्व विद्यमान व नवीन सुरू होणाऱ्या प्रकल्पांनी (क्षेत्रफळ ५००० चौरस मीटर व अधिक) हे परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हवा गुणवत्ता देखरेख प्रणाली आणि एलईडी इंडिकेटर (सिग्नल) बांधकामाच्या ठिकाणी बसवावेत. नवीन बांधकाम प्रकल्पांच्या बाबतीत, १५ दिवसांचा कालावधी हा बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष कोणतेही कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकापासून गृहीत धरण्यात येईल.

सदर परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन न केल्यास कारणे दाखवा नोटीस / काम थांबवण्याचे आदेश आणि लागू असलेली इतर दंडात्मक कारवाई केली जाईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सोबत :-

- **परिशिष्ट-अ :-** बांधकाम ठिकाणांवर बसविण्यात येणाऱ्या हवा गुणवत्ता देखरेख प्रणालीची आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये.
- **परिशिष्ट-ब :-** IITM च्या सह-स्थान अभ्यास द्वारे लघुसूचित करण्यात आलेले सेन्सर मेक आणि मॉडेल्सची यादी.
- **परिशिष्ट-क :-** बांधकाम व्यावसायिकांसाठी हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व धूळ तीव्रता पातळीनुसार कृती मार्गदर्शक तत्वे.

15/12/25

(पृथ्वीराज बी. पी.)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका